सतीमाता शिक्षण संस्थे द्वारा संचालित
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज
लोकसेवा नगर, भामटी रिंग रोड, नागपूर - ४४००२२, फोन नं. २२२७०६२
राष्ट्रीय सेवा योजना
डॉ. श्री. डी. व्ही. नाईक
प्राचार्य
प्रा. डॉ. विनोद बी. खेडकर
कार्यक्रम अधिकारी

पत्र क्रमांक MKU / NSS

दिनांक 16/01/2020

# अहवाल

## डॉ . एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर चे परसोडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर सपन्न

डॉ.एम. के. उमाठे कॉलेज नागपूरचे राष्ट्रीय सेवा योजना ( NSS ) महाविदयालयीन ७ दिवसीय निवासी शिबिर उत्साहात व विविध कार्यक्रमाने **"स्वयंपूर्ण ग्राम अभियानाकरिता युवाशक्ती "** या थिम अंतर्गत पार पडले. हे शिबीर दि. ९ जानेवारी ते १५ जानेवारी २०२० रोजी पार पडले.

दि. १० जानेवारी रोजी मौजे परसोडी ( चांपा) ता उमरेड जि. नागपुर येथे सकाळी १० .०० वाजता शिबीराचे उद्घाटन प्रा .डॉ . केशव वाळके ( संचालक रासेयो विभाग , रा तु म नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या हस्ते झाले . तर अध्यक्ष म्हणून श्री किशोरभाऊ उमाठे हे होते . तर प्रमुख उपस्थिती महाविदयालयाचे प्राचार्य डॉ डी. व्ही. नाईक , सरपंच अश्विन

NSS, Dr. M K Umathe College, Nagpur

Scanned by CamScanner

उके, ग्रामपंचायत सचिव श्रीमती खोडे मॅडम हे होते. उद्घाटना नंतर विद्यार्थ्यांनी ग्राम विकास रॅलीचे आयोजन केले.

तिसऱ्या दिवशी दि. ११ जानेवारी रोजी शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी सकाळी गावातील ग्रामपंचायत परिसरात लावलेल्या झाडांना सुरक्षा जाळ्या लाऊन त्यास कंपोस्ट खत व पाणी घातले . त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता बौध्दीक सत्राचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या तारादुत रश्मी कावरे ( सारथी संस्था )यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जीजाऊ यांचे जीवन चरित्र या विषयावर व्याख्यान दिले . व सायंकाळी ०६.०० ते ८.३० वेळेत सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

चौथ्या दिवशी दि. १२ जानेवारी रोजी सकाळी विदयार्थ्यांनी गावा मध्ये श्रमदान करून नालेसफाई , स्वच्छता करून ग्रामपंचायत अंगणवाडी करीता जे शिळे अन्न व पालापाचोळा या पासून कंपोस्ट खत निर्मिती करीता ५ x ५ (रूंद X लांब ) व ५ फुट खोल खड्डा घेण्यात आला. याच दिवशी दुपारी बौद्धीक सत्रामध्ये मुंबई अर्थशास्त्र व मानव विकास मंडळ विभाग, मुंबई विद्यापीठ मुंबई , येथिल डॉ. गणेश बडे यांचे पाणी नियोजन कायदा २००५ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते .

दि. १३ जानेवारी रोजी सकाळी ८.०० वाजता गावामध्ये स्वच्छता मोहिम राबवून विविध पथनाट्याव्दारे स्वच्छतेचे महत्व पटवून दिले . त्या नंतर कंपोस्ट खत निर्मितीचा अपूर्ण असलेला खड्डा पूर्ण करण्यात आला. दुपारी बौध्दीक सत्रामध्ये विद्यार्थ्यांना NSS मधिल आलेले अनुभव सांगितले . सध्यांकाळी ६.०० वाजता सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित केला.

NSS Dr. M.K.Umathe College, Nagpur

Scanned by CamScanner

दि . १४ जानेवारी सहाव्या दिवशी सकाळी ९.०० वाजता प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले . यामध्ये विविध सामाजिक गाण , गिते, घोषणा व पथनाट्यांच्या आधारे स्वच्छता, हागणदारीमुक्त गाव, जल व्यवस्थापण, बेरी बचाव बेटी पढाव, ग्राम विकास इत्यादी विषयी जाणीव व जागृती करण्यात आली . दुपारी २ .०० वाजता बौद्धीक सत्रामध्ये डॉ . राठी यांचे विद्यार्थी व गावकऱ्यांसाठी **Free Cancer Check up camp** चे आयोजन करण्यात आले होते.

दि . १५ जानेवारी सातव्या दिवशी शिबीराचे समारोप करण्यात आला . या समारोपाच्या प्रसंगी अध्यक्ष मा .श्री. किशोरभाऊ उमाठे (सचिव, सती माता शिक्षण संस्था ) हे होते तर प्रमुख पाहुणे मा. श्री. सुरेश कोल्हे ( गटविकास अधिकारी , उमरेड ) हे होते तर प्रमुख वक्ते श्री . जयसिंग जाधव ( सहा. गटविकास अधिकारी ) हे होते . प्रमुख उपस्थिती श्री सुभाष सानप ( विस्तार अधिकारी, उमरेड ) मा. श्री. अश्विन उके ( सरपंच , परसोडी ), सौ. किरण निकुरे ( उपसरपंच ), व्ही .जी. खोडे ( सचिव, ग्रामपंचायत ), व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.व्ही. नाईक यांची उपस्थिती होती. या प्रसंगी उत्कृष्ठ विद्यार्थी राहुल तेलंग व उत्कृष्ठ विदयार्थीनी किरण वर्दे यांना गौरविण्यात आले .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद खेडकर यांनी केले .सुत्रसंचालन राहुल तेलंग यानी केले तर आभार कु आरती मांझी हिने केले.

या सात दिवसीय शिबीरामध्ये श्रमदान, बौध्दीक कार्यक्रम, सांस्कृतीक कार्यक्रम, पथनाटय इ . व्दारे गावामध्ये जाणिव जागृती करण्यात आली . स्त्रीभ्रुणहत्या, महिला अत्याचार, महिला सक्षमीकरण, पाणी आडवा पाणी जीरवा, जल पुनर्भरण, शोष खड्ड्याचे महत्व, अंधश्रध्दा, बेटी बचाव बेटी पढाव, स्वच्छता, शेती विषयक योजना, ग्राम विकास, ग्रामीण समस्या व त्यावरील उपाय, व्यसनाधिनता व त्यावरील उपाय इत्यादी विषयावर

NSS, Dr. M.K.Umathe College, Nagpur

Scanned by CamScanner

सांस्कृतीक कार्यक्रम गिते, पथनाटय व नाटकांच्या माध्यमातून जागृती करण्यात आली . यामध्ये एकूण १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

हे शिबीर यशस्वी करण्या करीता डॉ . विनोद खेडकर ( कार्यक्रमाधिकारी , रासेयो ) डॉ . उज्वला साळवे (सहकार्यक्रमाधिकारी , रासेयो ) यांनी प्रयत्न केले, तर या शिबीरा करीता डॉ .डी.एस. सुखदेवे , डॉ . के .आर. टेकाडे , डॉ विजय बन्सोड , डॉ .आर.बी. सेलुकर, डॉ . समीर नईम , डॉ . प्रिती उमाठे , श्री . एच .आर. सिध्देवार ,डॉ कविता बोरकर , डॉ . वैशाली मेश्राम , डॉ . सौरभ शुक्ला , प्रा . अस्तिक गोवारकर , प्रा . पार्थ शर्मा, प्रा . संजय मेश्राम , प्रा . आंबटकर , प्रा . धिरज पांडे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सहयोग मिळाला .

**डॉ . विनोद बी .खेडकर**

**कार्यक्रम अधिकारी,**

**रासेयो**

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रिय सेवा योजना
डॉ एम के. उमाठे कॉलेज
नागपुर ४४००२२

NSS, Dr. M K Umathe College, Nagpur

Scanned by CamScanner

Photo




















कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रिय सेवा योजना
डॉ. एम. के. उमाठे कॉलेज
४४००२२

Scanned by CamScanner




















कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रिय सेवा योजना
डॉ एम के. उमाठे कॉलेज
नागपुर ४४००२२

Scanned by CamScanner